राज्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी सन २०२१-२२ या सत्रापासुन होणाऱ्या प्रवेशासाठी सुधारित नियमावली व पध्दतीमध्ये सुधारणा करण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : समिती-२०२०/प्र.क्र. १२८/व्यशि-३,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २९ जुन, २०२१.

वाचा:-

१) शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-३३१५/प्र.क्र.१७/व्यशि-३, दि. १४ मे, २०१५.
२) शासन निर्णय क्रमांक : समिती २०२०/प्र.क्र.१२८/व्यशि-३, दि. १६ ऑक्टोंबर २०२०.

**प्रस्तावना** :-

प्रवेश सत्र सन २०१३-१४ पासून राज्यातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व प्रवेश सत्र २०१५-१६ पासून सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्प कारागीर प्रशिक्षण योजने अंतर्गत प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पध्दतीमार्फत राबविण्यात येत आहे. या करिता उपरोक्त सदर्भाधिन शासन निर्णय क्रमांक-०१ दि. १४.०५.२०१५ अन्वये औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्प कारागीर प्रशिक्षण योजने अंतर्गत प्रवेश नियमावली व पध्दती निश्चित करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे संदर्भ क्रमांक-०२ दि. १६.०७.२०२० अन्वये तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या अधीन राहून प्रवेश नियमावली व पध्दतीमध्ये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. राज्यातील शासकीय तसेच खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील शिल्प कारागीर प्रशिक्षण योजने अंतर्गत प्रवेश नियमावली व पध्दतीमध्ये सुधारणा करणे तसेच संबंधित विभागीय परिक्षा मंडळानी निर्गमित केलेल्या इ. १० वी च्या गुणपत्रीकेतील गुण व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रवेश नियमावली नुसार निर्धारित गुणाधिक्य या आधारे सर्वसाधारण गुणवत्ता यादी तयार करुन सुधारित प्रवेश नियमावली व पध्दतीनुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रवेश प्रक्रिया राबविण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने शासनाने खालील प्रमाणे दि.१४.०५.२०१५ व दि.१६.०७.२०२० च्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने शासन शुध्दीपत्रक निर्गमित करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

**शासन निर्णय :-**

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने सन २०२१-२२ या प्रवेश सत्रामध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेअंतर्गत करावयाच्या प्रवेश प्रक्रियेकरिता प्रस्तावित केलेली सुधारित प्रवेश नियमावली व पध्दती सोबत जोडलेल्या प्रपत्र - अ प्रमाणे असणार आहे. सुधारीत प्रवेश नियमावली व पध्दतीनुसार शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेतर्गंत सन २०२१-२२ या सत्राकरिता प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१०६२९१७०७१८९००३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vinod S Bondre

Digitally signed by Vinod S Bondre
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=eOffice, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a12c7f1f38ac4843c1097ae135afa734591db9c7fc1f0b1e67c1629a13aa401e, serialNumber=c313a8b86d67716d182c41d1e22f57d99c8ee5f4654a216d8fe23b5ad24ed271, cn=Vinod S Bondre
Date: 2021.06.29 17:18:09 +05'30'

**( विनोद बोंदरे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
२. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
३. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
४. सह सचिव (व्यशि), उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
५. संचालक (व्यवसाय शिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. सह संचालक, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
८. प्राचार्य, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (सर्व संचालनालयामार्फत)
९. महालेखापल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र मुंबई / नागपूर
१०. महालेखापल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र मुंबई / नागपूर
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१२. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (सर्व जिल्हे) (संचालनालयामार्फत)
१३. निवड नस्ती/ व्यशि-३.

## प्रपत्र - अ

## प्रवेश सत्र सन २०२१ साठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रवेश नियमावली व पध्दतीमध्ये प्रस्तावित सुधारणा

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>शासन निर्णय दि. १४.०५.२०१५ व दि.१६.१०.२०२० अन्वये नियम</th><th>प्रस्तावित सुधारित नियम</th></tr>
<tr><td>०१</td>
<td>१.५ केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेसाठी उपलब्ध जागांचे वाटप:<br>प्रवेश अधिकाऱ्याकडून प्रवेशाकरिता उपलब्ध जागांचे वाटप खाली नमूद केलेल्या तपशीलाप्रमाणे होईल.
<table>
<tr><th>जागा वाटप</th><th>प्रवेशाकरिता उपलब्ध जागा</th></tr>
<tr><td>मूळ जिल्हा पातळीवर ७०% जागा (Home District Level)</td><td>सर्वसामान्य प्रवेश पध्दतीमध्ये नियम क्र.१.४ नुसार दिलेल्या जागांपैकी ७०% जागा ह्या उमेदवाराने ज्या जिल्ह्यामधून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) दिलेली आहे त्याच जिल्ह्यामधील औ.प्र.संस्थेत प्रवेशासाठी उपलब्ध आहेत.</td></tr>
<tr><td>जिल्हाबाह्य पातळीवर ३०% जागा (Outside Home District Level)</td><td>सर्वसामान्य प्रवेश पध्दतीमध्ये नियम क्र.१.४ नुसार दिलेल्या जागांपैकी ३०% जागा ह्या महाराष्ट्र राज्यातील उमेदवाराने ज्या जिल्ह्यामधून माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परीक्षा (SSC) दिलेली आहे त्या जिल्ह्याव्यतिरिक्त इतर जिल्ह्यातील औ.प्र.संस्थांमध्ये प्रवेशासाठी आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत.<br>राज्यस्तरीय गुणवत्ता यादीमधील ज्या उमेदवाराने अशा जिल्ह्याबाहेरील ३०% जागांकरिता पर्याय दिला आहे, त्यांना प्रवेश देण्यात येईल. ३०% जागांपैकी वरील प्रमाणे प्रवेश देऊन रिक्त असलेल्या जागा, ७०% जागांकरि पर्याय दिलेल्या उमेदवारांना पुढील फेरीत प्रवेशाकरिता उपलब्ध होतील.</td></tr>
</table></td>
<td>१.५ केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेसाठी उपलब्ध जागांचे वाटप:<br>प्रवेश अधिकाऱ्याकडून प्रवेशाकरिता उपलब्ध जागांचे वाटप खाली नमूद केलेल्या तपशीलाप्रमाणे होईल.
<table>
<tr><th>जागा वाटप</th><th>प्रवेशाकरिता उपलब्ध जागा</th></tr>
<tr><td>मूळ जिल्हा पातळीवर ९०% जागा (Home District Level)</td><td>सर्वसामान्य प्रवेश पध्दतीमध्ये नियम क्र.१.४ नुसार दिलेल्या जागांपैकी ९०% जागा ह्या उमेदवाराने ज्या जिल्ह्यामधून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) दिलेली आहे त्याच जिल्ह्यामधील औ.प्र.संस्थेत प्रवेशासाठी उपलब्ध आहेत.</td></tr>
<tr><td>जिल्हाबाह्य पातळीवर १०% जागा (Outside Home District Level)</td><td>सर्वसामान्य प्रवेश पध्दतीमध्ये नियम क्र.१.४ नुसार दिलेल्या जागांपैकी १०% जागा ह्या महाराष्ट्र राज्यातील उमेदवाराने ज्या जिल्ह्यामधून माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परीक्षा (SSC) दिलेली आहे त्या जिल्ह्याव्यतिरिक्त इतर जिल्ह्यातील औ.प्र.संस्थांमध्ये प्रवेशासाठी आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत.<br>राज्यस्तरीय गुणवत्ता यादीमधील ज्या उमेदवाराने अशा जिल्ह्याबाहेरील १०% जागांकरिता पर्याय दिला आहे, त्यांना प्रवेश देण्यात येईल. १०% जागांपैकी वरील प्रमाणे प्रवेश देऊन रिक्त असलेल्या जागा, ९०% जागांकरिता पर्याय दिलेल्या उमेदवारांना पुढील फेरीत प्रवेशाकरिता उपलब्ध होतील.</td></tr>
</table></td></tr>
</table>

| अ.क्र. | शासन निर्णय दि. १४.०५.२०१५ अन्वये नियम | प्रस्तावित सुधारित नियम |
|---|---|---|
| ०२ | **४.० चालू प्रशिक्षण वर्षामध्ये शिल्प कारागीर प्रशिक्षण योजने अंतर्गत व्यवसायांचा प्रथम वर्ष पुनर्प्रवेश/नवीन प्रवेश घेऊ इच्छिणारे उमेदवार:**<br>ज्या उमेदवाराने मागील प्रशिक्षण वर्षात औ.प्र. संस्थामधून कोणत्याही अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेला असेल, तो उमेदवार चालू वर्षात प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी पात्र आहे. तथापि, त्यांना मागील प्रशिक्षण वर्षात पास झालेल्या कोणत्याही विषयात सवलत देण्यात येणार नाही. अशा उमेदवारांना सक्षम अधिकाऱ्याने सूचित केलेल्या नमुन्याप्रमाणे पुढील प्रवेशासाठी पूर्वी प्रवेश घेतलेल्या संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करावे लागेल. असे पुनर्प्रवेश घेतलेले उमेदवार कोणत्याही प्रकारची शासकीय शिष्यवृत्ती/ निर्वाहभत्ता वा इतर सुविधेसाठी पात्र राहणार नाहीत. तसेच अशा उमेदवारांना प्रशिक्षण शुल्कात कोणतीही सवलत दिली जाणार नाही. | **४.० चालू प्रशिक्षण वर्षामध्ये शिल्प कारागीर प्रशिक्षण योजने अंतर्गत व्यवसायांचा प्रथम वर्ष पुनर्प्रवेश/नवीन प्रवेश घेऊ इच्छिणारे उमेदवार:**<br>४.१ ज्या उमेदवाराने मागील प्रशिक्षण वर्षात औ.प्र. संस्थामधून कोणत्याही अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेला असेल, तो उमेदवार चालू वर्षात प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी पात्र आहे. तथापि, त्यांना मागील प्रशिक्षण वर्षात पास झालेल्या कोणत्याही विषयात सवलत देण्यात येणार नाही. अशा उमेदवारांना सक्षम अधिकाऱ्याने सूचित केलेल्या नमुन्याप्रमाणे पुढील प्रवेशासाठी पूर्वी प्रवेश घेतलेल्या संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करावे लागेल.<br>४.२ ज्या प्रशिक्षणार्थ्यांनी औ.प्र. संस्थेत अंतिम वर्षाची परिक्षा दिलेली असेल व त्या परिक्षेचा निकाल घोषित झाला असेल असे प्रशिक्षणार्थी पुनर्प्रवेशास पात्र असतील.<br>४.३ असे पुनर्प्रवेश घेतलेले उमेदवार कोणत्याही प्रकारची शासकीय शिष्यवृत्ती, निर्वाहभत्ता, प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना वा इतर सुविधेसाठी पात्र राहणार नाहीत. तसेच अशा उमेदवारांना प्रशिक्षण शुल्कात कोणतीही सवलत दिली जाणार नाही. |
| ०३ | **५.१ महाराष्ट्र राज्याच्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र मंडळाकडून जो उमेदवार तांत्रिक वा व्यावसायिक अभ्यासक्रम घेऊन माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झाला आहे अशा उमेदवारांना १०% आरक्षणाची तरतूद.**<br>५.१.१ व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी सूचित केलेले तांत्रिक वा व्यावसायिक विषय घेऊन माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परीक्षा (SSC) उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना नियम १.४ मध्ये सूचित केलेल्या केंद्रीय प्रवेश पध्दतीत उपलब्ध असलेल्या जागा अंतर्गत सर्व अभियांत्रिकी व बिगर अभियांत्रिकी व्यवसायांसाठी उपलब्ध असलेल्या जागांपैकी १०% जागा आरक्षित जागा म्हणून उपलब्ध आहेत.<br>५.१.२ अशा आरक्षित जागांमध्ये मागासवर्गीय व महिला श्रेणी उमेदवारांकरिता नियमानुसार आरक्षण असेल. | **रद्द** |

<table>
<tr><th></th><th></th><th></th></tr>
<tr><th>अ.क्र.</th><th>शासन निर्णय दि. १४.०५.२०१५ अन्वये नियम</th><th>प्रस्तावित सुधारित नियम</th></tr>
<tr><td>०४</td><td>

**५.२ संरक्षण सेवेतील कर्मचारी वा कर्मचाऱ्यांच्या मुला/ मुलींकरिता आरक्षण:**

५.२.१ संरक्षण सेवेत कार्यरत असलेल्या अथवा संरक्षण सेवेतील माजी कर्मचारी/ कर्मचाऱ्यांच्या पाल्यांकरिता नियम १.४ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे केंद्रीय प्रवेश पध्दती अंतर्गत प्रत्येक औ.प्र. संस्थेमध्ये १% जागा त्याची कमाल १० जागांच्या मर्यादेपर्यंत खाली नमूद केलेल्या तक्त्यातील निवडश्रेणीसाठी उतरत्या प्राधान्य क्रमाने आरक्षित असतील.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>संरक्षण श्रेणी</th><th>तपशील</th></tr>
<tr><td>१.</td><td>डी - १ (D - १)</td><td>युध्दात वीर मरण प्राप्त झालेल्या संरक्षण सेवेतील कर्मचारी/अधिकारी यांचे पाल्य</td></tr>
<tr><td>२.</td><td>डी - २ (D - २)</td><td>युध्दात अपंगत्व प्राप्त झालेला माजी सैनिक</td></tr>
<tr><td>३</td><td>डी - ३ (D - ३)</td><td>युध्दात अपंगत्व प्राप्त झालेले संरक्षण सेवेतील कर्मचारी/अधिकारी यांचे पाल्य</td></tr>
<tr><td>४.</td><td>डी - ४ (D - ४)</td><td>किमान ५ वर्षे सेवा झालेला माजी सैनिक</td></tr>
<tr><td>५.</td><td>डी - ५ (D - ५)</td><td>महाराष्ट्र राज्यात अधिवास असलेल्या माजी सैनिकांचे पाल्य</td></tr>
<tr><td>६.</td><td>डी - ६ (D - ६)</td><td>महाराष्ट्र राज्यात अधिवास असलेले व सेवेत असलेल्या सैनिकांचे पाल्य</td></tr>
<tr><td>७.</td><td>डी - ७ (D - ७)</td><td>महाराष्ट्र राज्यात बदली झालेली आहे परंतु महाराष्ट्र राज्याचे अधिवास नसणारे संरक्षण सेवेतील कर्मचाऱ्यांचे/अधिकाऱ्यांचे पाल्य</td></tr>
<tr><td>८.</td><td>डी - ८ (D - ८)</td><td>संरक्षण सेवेतील कार्यरत कर्मचारी की जे महाराष्ट्र राज्यातील अधिवास नसणारे, परंतु मुलांच्या शिक्षणाच्या कारणास्तव लगतपूर्वीच्या कार्यालयांतर्गत कुटुंब निवासस्थान ताब्यात ठेवण्याच्या तरतुदीनुसार यांचे कुटुंब महाराष्ट्र राज्यात राहत आहे असा पाल्य, परंतु अशा उमेदवाराने महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त शाळेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) दिलेली पाहिजे.</td></tr>
</table>

</td><td>रद्द</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | ५.२.२ सर्व संरक्षण श्रेणी उमेदवारांचा गुणवत्तेनुसार एकत्रितरित्या विचार करुन संरक्षण सेवेतील कर्मचाऱ्यांच्या पात्रता धारक मुलांकरिता ह्या १% जागा (कमाल १० जागांच्या मर्यादेत) देण्यात येतील. सदर जागा राज्य स्तरावरील जागा म्हणून उपलब्ध असतील.<br>५.२.३ जर दोन उमेदवारांची गुणवत्ता समान असेल तर संरक्षण श्रेणीसाठी वर नमूद केल्याप्रमाणे प्राधान्यक्रम राहील<br>५.२.४ भारतीय संरक्षण सेवेत कार्यरत आहेत/होते अशा नागरी कर्मचाऱ्यांच्या मुलांकरिता ही संरक्षण श्रेणी आरक्षणाची तरतूद लागू नाही. | |
| ०५ | **५.४ अनाथ मुलांना समांतर आरक्षण:**<br>बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अन्वये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या अनाथ, निराधार बालकांना संस्थेतून बाहेर पडल्यानंतर जातीचा दाखला नसल्यामुळे विविध शासकीय लाभांपासून वंचित रहावे लागते. त्यामुळे अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा, याकरीता महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र. अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३, दि.०२.०४.२०१८ अन्वये शिक्षण व नोकरी यांमध्ये खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे.<br>त्यानुसार नियम १.४ मध्ये विहीत केलेल्या केंद्रीय प्रवेश पध्दती अंतर्गत उपलब्ध जागांच्या १% जागा अनाथ मुलांना आरक्षित असतील. त्यासाठी उमेदवारांनी खालील अटी व शर्तींची पूर्तता करणे आवश्यक राहील.<br>५.४.१ बालगृहातील व इतर अनाथ मुलांपैकी महिला व बालविकास विभागाकडून देण्यात येणारे अनाथ प्रमाणपत्र असणाऱ्या मुलांसाठीच हे आरक्षण लागू राहील.<br>५.४.२ ज्या मुलांच्या कागदपत्रावर कोणत्याही जातीचा उल्लेख नाही व ज्यांचे आईवडील, काका-काकू, आजी-आजोबा व इतर नातेवाईक यापैकी कोणाबाबतही माहिती उपलब्ध नाही, अशा मुलांनाच अनाथ आरक्षण लागू राहील.<br>५.४.३ संबंधित प्रवेशप्रक्रियेत अनाथ उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षणाचा अनुशेष पुढे न ओढता खुल्या प्रवर्गातून गुणवत्तेनुसार इतर उमेदवार प्रवेशास पात्र ठरतील.<br>५.४.४ शिक्षणांतर्गत शिष्यवृत्ती, वसतिगृह व व्यावसायिक शिक्षणांतर्गत शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेमध्ये सदर आरक्षण लागू राहील. | **५.४ अनाथ मुलांना समांतर आरक्षण:**<br>बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अन्वये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या अनाथ, निराधार बालकांना संस्थेतून बाहेर पडल्यानंतर जातीचा दाखला नसल्यामुळे विविध शासकीय लाभांपासून वंचित रहावे लागते. त्यामुळे अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा, याकरीता महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र. अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३, दि.०२.०४.२०१८ अन्वये शिक्षण व नोकरी यांमध्ये खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे.<br>त्यानुसार नियम १.४ मध्ये विहीत केलेल्या केंद्रीय प्रवेश पध्दती अंतर्गत उपलब्ध जागांच्या १% जागा अनाथ मुलांना आरक्षित असतील. त्यासाठी उमेदवारांनी खालील अटी व शर्तींची पूर्तता करणे आवश्यक राहील.<br>५.४.१ बालगृहातील व इतर अनाथ मुलांपैकी महिला व बालविकास विभागाकडून देण्यात येणारे अनाथ प्रमाणपत्र असणाऱ्या मुलांसाठीच हे आरक्षण लागू राहील.<br>५.४.२ ज्या मुलांच्या कागदपत्रावर कोणत्याही जातीचा उल्लेख नाही व ज्यांचे आईवडील, काका-काकू, आजी-आजोबा व इतर नातेवाईक यापैकी कोणाबाबतही माहिती उपलब्ध नाही, अशा मुलांनाच अनाथ आरक्षण लागू राहील.<br>५.४.३ संबंधित प्रवेशप्रक्रियेत अनाथ उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षणाचा अनुशेष पुढे न ओढता खुल्या प्रवर्गातून गुणवत्तेनुसार इतर उमेदवार प्रवेशास पात्र ठरतील.<br>५.४.४ शिक्षणांतर्गत शिष्यवृत्ती, वसतिगृह व व्यावसायिक शिक्षणांतर्गत शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेमध्ये सदर आरक्षण लागू राहील. |

| अ.क्र. | शासन निर्णय दि. १४.०५.२०१५ अन्वये नियम | प्रस्तावित सुधारित नियम |
|---|---|---|
| | ५.४.५ अनाथ मुलांसाठी लागू असलेले १% आरक्षणासाठी विहीत करण्यात आलेली पात्रता पूर्ण करणाऱ्या व या आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी अर्ज करणाऱ्या अनाथ उमेदवारांना नियम क्रमांक “८.० गुणवत्तेसाठी गुणाधिक्य” प्रमाणे गुणाधिक्य लागू राहणार नाही.<br>५.४.६ तथापि, अनाथ मुलांसाठी लागू असलेले १% आरक्षाणासाठी विषिध्द करण्यात आलेली पात्रता पुर्ण न करणाऱ्या अनाथ उमेदवारांना नियम क्रमांक “८.० गुणवत्तेसाठी गुणाधिक्य” प्रमाणे गुणाधिक्य लागू राहील. | |
| ०६ | **५.६ क्विन्स मेरी खाजगी औ.प्र. संस्था, पुणे येथे संरक्षण सेवा श्रेणीकरिता आरक्षण:**<br>५.६.१ क्विन्स मेरी खाजगी औ.प्र. संस्था, पुणेसाठी एकूण प्रवेशक्षमतेपैकी १०० टक्के जागा संरक्षण सेवा श्रेणीतील उमेदवारांसाठी आरक्षित राहतील.<br>५.६.२ क्विन्स मेरी खाजगी औ.प्र.संस्था, पुणेसाठी एकूण प्रवेशक्षमतेतील संरक्षण सेवा श्रेणीतील उमेदवारांसाठी १०० टक्के जागा संस्था पातळीवर भरल्या जातील. | **५.६ विशिष्ठ समाज घटकांकरीता स्थापन खाजगी औ.प्र. संस्थेत त्या घटकांसाठी प्रवेशासाठी उपलब्ध जागांबाबत आरक्षण:**<br>५.६.१ काही विशिष्ट समाज घटकांसाठी सुरू करण्यात आलेल्या खाजगी औ.प्र. संस्था जसेकी संरक्षण सेवेतील निवृत्त कर्मचारी, अपंग उमेदवार, महिला उमेदवार, अनाथ उमेदवार, प्रकल्प ग्रस्त उमेदवार, बाल गुन्हेगार, कर्मचारी पाल्य उमेदवार, इत्यादींसाठी काही प्रमाणात जागा राखिव ठेवतात. अशा खाजगी औ.प्र. संस्थांनी त्याबाबतची माहिती संचालनालयास प्रवेश प्रक्रिये पूर्वी सादर करावी.<br>५.६.२ प्रवेश सक्षम अधिकारी अशा खाजगी औ.प्र. संस्थांची यादी व विशिष्ट समाजघटकांसाठी आरक्षित जागांची टक्केवारी प्रवेश माहिती पुस्तिकेत “प्रपत्र - ७” म्हणुन प्रकाशित करतील.<br>५.६.३ विशिष्ट समाज घटकांतील उमेदवारांसाठी राखिव जागांवरील प्रवेश त्या पात्र उमेदवारांमधुन वैधानिक आरक्षणाच्या प्रमाणात भरण्यात येतील. |

| अ.क्र. | शासन निर्णय दि. १४.०५.२०१५ अन्वये नियम | प्रस्तावित सुधारित नियम |
|---|---|---|
| ०७ | **८ गुणवत्तेसाठी गुणाधिक्य:**<br>अंतिम गुणवत्ता ठरविण्याकरिता उमेदवारांना खालील प्रकारे काही व्यवसायांना अतिरिक्त गुणांचा लाभ देण्यात येईल. तथापि, सदर अतिरिक्त गुणांची मर्यादा ५० गुण एवढी असेल | **८ गुणवत्तेसाठी गुणाधिक्य:**<br>अंतिम गुणवत्ता ठरविण्याकरिता उमेदवारांना खालील प्रकारे काही व्यवसायांना अतिरिक्त गुणांचा लाभ देण्यात येईल. तथापि, सदर अतिरिक्त गुणांची मर्यादा ५० गुण एवढी असेल |

**शासन निर्णय दि. १४.०५.२०१५ अन्वये नियम:**

| अ.क्र. | पात्रतेचे वर्णन | गुण |
|---|---|---|
| ८.१ | इंटरमिडीएट चित्रकला परीक्षा उत्तीर्ण उमेदवार | १० |
| ८.२ | एन.सी.सी./एम.सी.सी./स्काऊट गाईड/सिव्हील डिफेन्स सर्व्हीस यामध्ये सहभाग घेतलेले उमेदवार | १० |
| ८.३ | विविध स्तरावर क्रिडा प्रकारांमध्ये सहभाग घेतलेला उमेदवार | |
| | ८.३.१ जिल्हा स्तरीय स्पर्धा | १० |
| | ८.३.२ राज्य स्तरीय स्पर्धा | १५ |
| | ८.३.३ राष्ट्रीय स्तरावर स्पर्धा | २५ |
| ८.४ | शासन मान्यताप्राप्त महाराष्ट्रातील बोल्स्टर स्कूलमधून उत्तीर्ण झालेले उमेदवार | २० |
| ८.५ | शासनमान्य अशासकीय संस्थांच्या महाराष्ट्रातील अनाथ आश्रमात वास्तव्यास असलेले उमेदवार<br>तथापि, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३, दि.०२.०४.२०१८ अन्वये बालगृहातील व इतर अनाथ मुलांपैकी महिला व बालविकास विभागाकडून देण्यात येणारे अनाथ प्रमाणपत्र असणाऱ्या मुलांसाठीच खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे. ज्या मुलांच्या कागदपत्रावर कोणत्याही जातीचा उल्लेख नाही व ज्यांचे आईवडील, काका-काकू, आजी-आजोबा व इतर नातेवाईक यापैकी कोणाबाबतही माहिती उपलब्ध नाही, अशा मुलांनाच अनाथ आरक्षण लागू राहील. सदर आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी अर्ज करणाऱ्या अनाथ | २० |

**प्रस्तावित सुधारित नियम:**

| अ.क्र. | पात्रतेचे वर्णन |
|---|---|
| ८.१ | इंटरमिडीएट चित्रकला परीक्षा उत्तीर्ण उमेदवार |
| ८.२ | विविध स्तरावर क्रिडा प्रकारांमध्ये सहभाग घेतलेला उमेदवार |
| | ८.२.१ जिल्हा स्तरीय स्पर्धा |
| | ८.२.२ राज्य स्तरीय स्पर्धा |
| | ८.२.३ राष्ट्रीय स्तरावर स्पर्धा |
| ८.३ | शासन मान्यताप्राप्त महाराष्ट्रातील बोल्स्टर स्कूलमधून उत्तीर्ण झालेले उमेदवार |
| ८.४ | तांत्रिक वा व्यावसायिक अभ्यासक्रम घेऊन माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण उमेदवार |
| ८.५ | संरक्षण सेवेतील खालील कर्मचारी वा कर्मचाऱ्यांचे पाल्य<br>८.५.१ युध्दात वीर मरण प्राप्त झालेल्या संरक्षण सेवेतील कर्मचारी/अधिकारी यांचे पाल्य<br>८.५.२ युध्दात अपंगत्व प्राप्त झालेला माजी सैनिक<br>८.५.३ युध्दात अपंगत्व प्राप्त झालेले संरक्षण सेवेतील कर्मचारी/अधिकारी यांचे पाल्य<br>८.५.४ किमान ५ वर्षे सेवा झालेला माजी सैनिक<br>८.५.५ महाराष्ट्र राज्यात अधिवास असलेल्या माजी सैनिकांचे पाल्य<br>८.५.६ महाराष्ट्र राज्यात अधिवास असलेले व सेवेत असलेल्या सैनिकांचे पाल्य<br>८.५.७ महाराष्ट्र राज्यात बदली झालेली आहे परंतु महाराष्ट्र राज्याचे अधिवास नसणारे संरक्षण सेवेतील कर्मचाऱ्यांचे/अधिकाऱ्यांचे पाल्य<br>८.५.८ संरक्षण सेवेतील कार्यरत कर्मचारी की जे महाराष्ट्र राज्यातील अधिवास नसणारे, परंतु मुलांच्या शिक्षणाच्या कारणास्तव लगतपूर्वीच्या कार्यालयांतर्गत कुटुंब निवासस्थान ताब्यात ठेवण्याच्या तरतुदीनुसार यांचे कुटुंब महाराष्ट्र राज्यात राहत आहे असा पाल्य, परंतु अशा उमेदवाराने महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त |

| | | |
|---|---|---|
| | उमेदवारांना "शासनमान्य अशासकीय संस्थांच्या महाराष्ट्रातील अनाथ आश्रमात वास्तव्यास असलेले उमेदवार" यांसाठी अनुज्ञेय गुणाधिक्य लागू राहणार नाही. | |
| ८.६ | २०११ च्या जनगणनेमध्ये ग्रामीण भाग म्हणून नमूद करण्यात आलेल्या भागातून उमेदवाराने माध्यमिक शालांन्त परीक्षा (SSC) दिलेली असल्यास | १० |

वर उल्लेखिल्याप्रमाणे गुणाधिक्यासाठी पुराव्यादाखल सादर करावयाची कागदपत्रे प्रपत्र - ३ मध्ये दिल्यानुसार आहेत.

| | |
|---|---|
| | शाळेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) दिलेली पाहिजे. |